**सं.फौ.प्र.क्र./३२३/२०२१**
**सर.–वि– प्रमोद**
**नि.क्र.१० वर पुढे सुरु.**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रं. ०१
मी शपथेवर खरे सांगतो की,
नावः विलास गोविंदराव पाथरीकर, वय–४५ वर्ष,
कामधंदा –नोकरी, रा.सेंदुरवाफा, तह.साकोली, जि.भंडारा.

**साक्षीदाराचा सरतपास सरकारतर्फे अधिवक्ता श्री. एन. के. गणवीर यांच्यामार्फत सुरुः–**

घटना दिनांक २९/०६/२०२१ रोजी तालुका बिजगुणन प्रक्षेत्र साकोली येथे घडली. मी त्यावेळेस तिथेच कृषी पर्यवेक्षक म्हणून कार्यरत होतो. त्यादिवशी सकाळी मी १०.०० वाजता कार्यालय उघडले आणि मी उपविभागीय कृषी अधिकारी कार्यालय साकोली येथे कामानिमित्त्य गेलो. सकाळी ११.०० वाजता नंतर मी परत प्रक्षेत्रावर आलो. मी कार्यालयाच्या मागच्या बाजुला फिरतीवर गेलो असता मला एक इसम ट्रॅक्टरने जमिन नांगरतांना आढळला. ती जमिन शासनाची आहे. तिचा गट क्र.४०३ असा आहे. तिथे मी ट्रॅक्टरचालकाला जाऊन विचारल्यावर त्याने मालक जवळ उभे असल्याचे सांगितले. मालकाने त्याचे नाव प्रमोद शंकर लांजेवार असे सांगितले. तो व्यक्ती न्यायालयात आरोपी म्हणून हजर आहे. त्यावेळेस मी त्याला सरकारी जमिनीवर नांगरणी करण्याबाबत विचारले. आरोपीने मला सांगितले की, त्याच्याजवळ जमिनीसंबंधात कागदपत्रे आहेत. त्यानंतर आरोपी आणि ट्रॅक्टरचालक तिथुन निघुन गेले. दिनांक ३०/०६/२०२१ रोजी पुन्हा ११.०० वाजताच्या सुमारास मी कार्यालयात हजर असतांना मला लोकांकडून त्याच जागेवर कोणीतरी ट्रॅक्टरने नांगरणी करत असल्याबाबतचे कळले. मी तिथे गेल्यावर आरोपी पळून गेला. तिथे साधारण ५ ते ७ एकरची जागा आरोपीने नांगरणी केली असेल. ती जमिन आरोपीची नाही. शासनाची आहे. मी त्यानंतर रिपोर्ट दिला. आता मला लेखी रिपोर्ट आणि छापील प्रथम खबर अहवाल दाखविण्यात आले. त्यावर माझ्या सहया असून मजकुर बरोबर आहे. त्यांना अनुक्रमे **नि.क्र.१४ आणि १५** देण्यात येतो. पोलीस घटनास्थळी आले होते. त्यांनी माझी चौकशी केली होती.

सरतपास समाप्त.

**उलटतपास आरोपीतर्फे अधिवक्ता श्री. एस. के. बोरकर यांच्यामार्फत सुरुः–**

पोलीसांनी मला मी कृषी पर्यवेक्षक पदावर असल्याबाबत ओळखपत्राची मागणी केली नाही. मी दिनांक २९/०६/२०२१ आणि ३०/०६/२०२१ रोजी कार्यालयात उपस्थित असल्याबाबत कोणतेही कागदपत्रे पोलीसांना दिले नाही. हे म्हणणे खरे नाही की, गट क्र.४०३ मधील ४.२७ हे.आर.शेतजमिन हेमलता कुरसुंगे हिची आहे आणि सन १९५० च्या पुर्वीपासुन ते त्या जागेची फसल घेतात. मला गट क्र.४०३ चा जुना गट क्रमांक माहित नाही. मला ती जमिन शासनाला केव्हा मिळाली याबाबत माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, त्या जमिनीच्या पलीकडे असलेल्या शेतजमिनीची वहीती करण्याकरीता शेतक–यांना गट क्र.४०३ मधुन ट्रॅक्टर न्यावे लागते. मला गट क्र.४०३च्या चतुर्सिमा सांगता येतात. पुर्वेस डांबर रोड आहे, पश्चीमेस नाला आहे, उत्तरेस लहान रस्ता आहे आणि दक्षिणेस सुध्दा एक लहान रस्ता आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी चुकीच्या चतुर्सिमा सांगितल्या. घटनेच्या वेळेस गट क्र.४०३ मधील जमिन पेरलेली नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, कधीही आमच्या

शेतात ट्रॅक्टरने नांगरणी करण्यात आली नाही. ट्रॅक्टर चालविणा–या इसमाचे नाव मला माहित नाही. पोलीसांना मी बयाण देतांना पाच ते सात एकर शेतजमिन नांगरण्यात आल्याचे सांगितले होते. पोलीसांनी माझ्या बयाणात तसे का नमुद केले नाही याचे कारण मी सांगु शकत नाही. पोलीसांना बयाण देतेवेळी लोकांकडून मला दिनांक ३०/०६/२०२१ रोजी शेतजमिन नांगरणी करीत असल्याचे कळल्याची बाब मी सांगितली होती. पोलीसांनी माझ्या बयाणात तसे का नमुद केले नाही याचे कारण मी सांगु शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, दिनांक ३०/०६/२०२१ रोजी आरोपी मला प्रत्यक्ष जमिनीवर नांगरणी करताना दिसला नाही. साक्षीदार स्वतःहुन सांगतो की, आरोपी मला पळतांना दिसला. हे म्हणणे खरे नाही की त्यादिवशी कोण ट्रॅक्टरने नांगरणी करीत होते ते मी प्रत्यक्ष पाहिले नाही. मला ट्रॅक्टरचा क्रमांक माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, सरतपासातील संपुर्ण मजकुर मी खोटा सांगितला आहे. हे म्हणणे खरे नाही की, जमिनीमध्ये अनधिकृतपणे प्रवेश करुन कोणतीही नांगरणी आरोपीने केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर जमिनीतुन येणेजाणे होऊ नये म्हणून मी आरोपीविरुद्ध खोटा रिपोर्ट देवून खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास समाप्त.

**फेरतपास काही नाही.**

समक्ष व श्रवणोत्तर स्विकृत

(नि.प्र.तळणीकर)
न्यायदंडाधिकारी प्रथमश्रेणी, साकोली
**२५/०१/२०२४**